नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

नाशिक शाखा

जा.क्र बांप/मौ.गोंदेदुमाला ता.इगतपुरी/ग.नं.६०७/२ व ६२९/ससंना/253

नाशिक : ४२२००२

दिनांक : ३०.०१.२०१५

प्रति,

उपविभागीय अधिकारी,
इगतपुरी त्र्यंबकेश्वर उपविभाग
नाशिक

विषय :- मौजे गोंदेदुमाला ता.इगतपुरी जि. नाशिक.
येथील ग.नं.६०७/२ व ६२९ मधील.,भू.क्र.१ क्षेत्र ८९८१ चौ.मी मधील रहिवास (ग्रुप हौसींग) प्रयोजनासाठी बांधकाम नकाशे मंजुरीबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.जमाबंदी/काबि/२०१५/४१/१५०/४८, दि.०६.०१.२०१५

विषयांकित जागेत अर्जदाराने रहिवास प्रयोजनासाठी सादर केलेले बांधकाम नकाशे सर्वसाधारणपणे योग्य असून, सदर नकाशांना मंजूरीची शिफारस खालील अटींस अधिन राहून करण्यांत येत आहे.

१) जागेचा वापर रहिवास कारणासाठीच करणेत यावा.

२) भूखंडाची मापे नकाशावर दर्शविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर जुळत असली पाहीजेत, व समोरुन, मागून व बाजूने सोडावयाचे समास, बांधकामा नंतर जागेवर खुले असले पाहीजेत.

३) सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ती कामे नियोजन प्राधिकरणांस समाधानकारक वाटतील अशा प्रकारे केली पाहीजे.

४) जोत्या पर्यत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मंजूर नकाशा प्रमाणे आहे असे प्रमाणपत्र नियोजन प्राधिकरणाकडून घेतल्या शिवाय पुढील बांधकाम करु नये.

५) अर्जदाराचे यांचे इंजिनिअर/आर्किटेक्ट यांचेकडून Earth quake Structural Stability Certificate प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

६) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पूर्ततेचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर सुरु करु नये.

७) दिलेली शिफारस ही फक्त एक वर्षासाठी वैध राहील व हया मुदतीत बांधकाम सुरु न झाल्यांस शिफारशीचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.

८) नियोजन प्राधिकरणाकडुन/ ग्रामपंचायत, महसुल खात्याकडून किंवा इतर खात्याकडून आवश्यक ती परवानगी मिळवणे ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी राहील.

९) या सोबत शिफारस केलेले बांधकाम नकाशे सुधारित करुन पुन्हा परवानगी घ्यावयाची असल्यांस मंजूर बांधकाम नकाशे सुधारित करण्याची कारणे नमूद करणे आवश्यक आहे.

१०) विषयांकित क्षेत्राच्या स्थळाबाबत व चर्तु:सिमेबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास जागेवरील परिस्थितीनुसार नकाशा सुधारित मंजूर करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

११) विषयांकित भूखंडांत Rain Water Harvesting बाबतची अंमलबजावणी करणे भूखंडधारकास बंधनकारक राहील.

१२) अर्जदाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास केलेली शिफारस रद्द समजणेत येईल.

१३) सदर जागेतील रहिवासी यांना पाणीपुरवठा करणे तसेच जागेत मल निस्सारणासाठी /S.T.P ची तरतूद स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

कार्यालयाच्या अभिलेखासाठी मंजूर नकाशाची एक प्रत, मालकी हक्काचा उतारा, इत्यादि ठेवून इतर सर्व कागदपत्र परत करीत आहे.

सहायक संचालक, नगर रचना,
नाशिक